# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28/07/2015 (का.प.क्र.-04) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 28 जुलै 2015 रोजी (का.प.क्र .04) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त तथा अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
04. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
05. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
06. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
07. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
08. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
09. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
10. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
11. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
12. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.नितीन चित्ते :या देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.अब्दुलजी कलाम साहेब यांचे काल एका कार्यक्रमात गेले असता, त्या ठिकाणी  ह्दय विकाराचा झटका येवुन दु:खद निधन झाले. थोर महान व्यक्ती गेल्यामुळे भारताचे फार मोठे नुकसान झाले आहे. एका सामान्य कुटूंबातील व्यक्ती भारताचे राष्ट्रपती झाले. मा.अटलबिहारी वाजपयी, हे पंतप्रधान असतांना श्री.लालकृष्ण आडवाणी उपपंतप्रधान असतांना मा.डॉ.अब्दुल कलाम यांना राष्ट्रपती पदाचे उमेदवार म्हणुन घोषित केले. त्यास सर्वानुमते त्यांची निवड करण्यात आली. अशा महान व्यक्तीस सभेतर्फे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :मा.डॉ.अब्दुल कलाम या देशाचे लाडके माजी राष्ट्रपती यांचे ह्दय विकाराच्या झटक्याने काल दु:खद निधन झाले त्यांचे निधनामुळे देशाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. स.सदस्यांनी सुचविल्यानुसार यास माझे अनुमोदन आहे. सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम साहेब यांचे काल दु:खद निधन झाले आहे. भारताचे फार मोठे नुकसान झालेले आहे. महान शास्त्रज्ञ, राष्ट्रपती यांचे दु:ख निधनाबाबत शोक व्यक्त करीत आहे. त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा.सभापती :माजी राष्ट्रपती दिवंगत श्री.अब्दुल कलाम साहेब यांचे काल ह्दय विकाऱ्याच्या झटक्याने दु:ख निधन झाले आहे. महान शास्त्रज्ञ यांनी भारताच्या क्षेपानास्त्रामध्ये त्रिशुल, पृथ्वी, अग्नि फार मोठे योगदान दिलेले आहे. त्यांना मिसाईल मॅन म्हणुन ओळखले जात होते. जगात भारताला एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. अशा महान व्यक्तीला सभागृहाकडुन श्रध्दांजली वाहण्यात येते.

(दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात येते)

मा.सभापती : :माजी राष्ट्रपती दिवंगत श्री.अब्दुलजी कलाम साहेब यांचे दु:ख निधन झाल्याने तसेच राष्ट्रीय दुखवटा असल्याने आजची सभा पुढील सूचने पर्यंत तहकूब करण्यात येते.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद